# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 October 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – ११ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- नवी मुंबई विमानतळाची वायूदलाकडून चाचणी यशस्वी - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते वैमानिकांचा सत्कार
- देशात ग्रामीण कुटुंबांच्या मासिक उत्पन्नात सरासरी ५७ टक्के वाढ झाल्याचं नाबार्डच्या सर्वेक्षणातून स्पष्ट
- नाशिक जवळील देवळाली छावणीत तोफ गोळ्याचा स्फोट होऊन दोन अग्निवीरांचा मृत्यू
- रिपब्लिकन पक्षाला महायुतीत ८ ते १० जागा देण्याच्या मागणीचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा पुनरुच्चार

आणि

- उद्या विजयादशमी–ठिकठिकाणच्या देवीमंदिरांमध्ये होमहवन–दर्शनासाठी भाविकांची गर्दी

****

नवी मुंबई विमानतळावर चार टर्मिनलची उभारणी होणार असून या विमानतळावरून वर्षाला ९ कोटी लोक प्रवास करतील, तसंच २६ लाख टन कार्गो वाहतूक होईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या हवाई पट्टीवर भारतीय वायू दलाच्या C–295 विमानाचं यशस्वी अवतरण झाल्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. ते म्हणाले –

***हे एअर पोर्ट जे आहे, हे देशातलं नंबर एकच एअरपोर्ट आहे. यामध्ये वर्षाला नऊ कोटी लोक प्रवास करतील. आणि जवळपास टू पॉईंट सिक्स दशलक्ष टन कार्गोमध्ये वाहतूक होईल. याच्या दोन एअरस्ट्रीप पॅरलल चलणार आहेत. आणि हे देशातलं सर्वात मोठं एअरपोर्ट ठरेल.***

या विमानतळाचं काम आता अंतिम टप्प्यात आहे. त्यासाठी विमानतळाच्या धावपट्टीची आज चाचणी करण्यात आली. सुखोई–३० या लढाऊ विमानानेही फ्लायपास्ट केला. या विमानाच्या वैमानिकांचा मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

देशात ग्रामीण कुटुंबांच्या मासिक उत्पन्नात सरासरी ५७ टक्के वाढ झाली आहे. राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक–नाबार्ड च्या अखिल भारतीय सर्वेक्षणातून ही बाब स्पष्ट झाली आहे. २०१६–१७ ते २०२१–२२ या कालावधीत ग्रामीण कुटुंबांचं मासिक उत्पन्न सरासरी आठ हजार ५९ रुपयांवरून १२ हजार ६९८ रुपये झालं आहे. याच कालावधीत या कुटुंबांचा मासिक खर्चही सरासरी सहा हजार ६०० रुपयांवरून ११ हजार दोनशे रुपये झाला, तसंच बचतीच्या प्रमाणातही सुमारे पन्नास टक्के वृद्धी झाल्याचं नाबार्डच्या सर्वेक्षणात म्हटलं आहे.

देशातल्या ग्रामीण कुटुंबांमध्ये विमा सुरक्षेतही लक्षणीय वाढ असून, किमान एक सदस्य विमा धारक असलेल्या कुटुंबांचं प्रमाण २५ टक्क्यांवरून ८० टक्क्यांच्या वर गेलं आहे.

****

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचं थोड्या वेळापूर्वी नांदेड इथं आगमन झालं. माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण यांच्यासह विभागीय आयुक्त दिलीप गावडे आणि अन्य मान्यवरांनी राज्यपालांचं स्वागत केलं. नांदेडच्या शासकीय विश्रामगृहात विविध क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद साधून सायंकाळी राज्यपाल मुंबईला प्रयाण करणार आहेत.

नांदेड दौऱ्यापूर्वी राज्यपालांनी यवतमाळ इथं विविध क्षेत्रातल्या मान्यवरांशी संवाद साधला.

****

रत्नागिरी तालुक्यातल्या झाडगाव औद्योगिक वसाहतीत पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते आज १९ हजार ५५० कोटी रुपये गुंतवणूक होणाऱ्या वेल्लोर सेमीकंडक्टर प्रकल्पाचं भूमिपूजन झालं. या प्रकल्पातून रोजगाराच्या ३३ हजार ६२० संधी उपलब्ध होणार आहेत.

****

दिवंगत उद्योजक रतन टाटा यांच्या सन्मानार्थ राज्य सरकारच्या उद्योगरत्न पुरस्काराचं 'रतन टाटा उद्योगरत्न पुरस्कार' आणि उद्योग भवनाचं 'रतन टाटा उद्योगभवन' असं नामकरण केलं जाणार आहे. गेल्या वर्षापासून राज्य सरकारने हा पुरस्कार सुरू केला आहे. पहिला पुरस्कार रतन टाटा यांनाच प्रदान करण्यात आला होता.

दरम्यान, टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी नोएल टाटा यांची एकमतानं निवड झाली आहे. टाटा ट्रस्ट ही टाटा समूहाची सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी शाखा आहे. ट्रस्टच्या संचालक मंडळाच्या बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला. दिवंगत रतन टाटा यांचे सावत्र बंधू असलेले नोएल टाटा सध्या टाटा स्टील आणि व्होल्टाससह इतरही कंपन्यांच्या संचालक मंडळाचे सदस्य आहेत.

****

माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या वर्षीही सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयं, शासकीय संस्था, मंडळे, सार्वजनिक उपक्रम कार्यालयांनी विविध उपक्रमांचं आयोजन करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत. प्रसारमाध्यमांच्या कार्यालयात देखील वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात यावा, असं आवाहन मराठी भाषा विभागाचे सहसचिव डॉ. नामदेव भोसले यांनी केलं आहे.

****

नाशिक जवळील देवळाली छावणीत आज सकाळी तोफ गोळ्याचा स्फोट होऊन दोन अग्नीवीरांचा मृत्यू झाला. गोहिल विश्वराज सिंग आणि सैफत शीत अशी या दोघांची नावं आहेत. तोफ चालवण्याचं प्रशिक्षण घेत असताना हा स्फोट झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. या दुर्घटनेत अन्य एक अग्निवीर जखमी असून त्याच्यावर लष्कराच्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

****

रिपब्लिकन पक्षातील अंतर्गत गटबाजीमुळे समाजाचं नुकसान होत असल्याची खंत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे. ते आज नागपूर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. महायुतीमध्ये विधानसभेच्या जागावाटपाची अजून चर्चा चालू असून रिपब्लिकन पक्षाला ८ ते १० जागांची मागणी केल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. ते म्हणाले –

> ***मी अलायंस मध्ये आहे. आमच्या पक्षाला जास्त जागा मिळत नाहीयेत. माझ्या पक्षाने अनेक वेळेला मागणी केलेली आहे. अनेक नेत्यांशी आमची चर्चा झालेली आहे. पण अजून रिपब्लिकन पक्षाला किती जागा देणार हे आमच्यासमोर प्रश्नचिन्ह आहे. आणि फार जागा द्याव्यात ही माझ्या पक्षाची भूमिका नाही. माझ्या पक्षाने आठ – दहा जागा मिळाव्यात ही अपेक्षा केलेली आहे.***

****

दसरा अर्थात विजयादशमीचा सोहळा उद्या साजरा होत आहे. यानिमित्तानं सर्वत्र सरस्वती पूजन, शस्त्रपूजनासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येतं. घटस्थापनेनं प्रारंभ झालेल्या नवरात्रोत्सवाची दसऱ्याला सांगता होते, या पार्श्वभूमीवर आज ठिकठिकाणच्या देवी मंदिरांमध्ये होमहवन आदी धार्मिक विधी पार पडले.

किल्ले प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आराध्य भवानी मातेचा आज केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते अभिषेक तसंच आरती करण्यात आली. यावेळी खासदार उदयनराजे भोसले यांच्यासह प्रतापगड विकास प्राधिकरणाचे सदस्य उपस्थित होते. भूपेंद्र यादव यांचा छत्रपती उदयनराजे भोसले यांनी शिवमुद्रा आणि तलवार देऊन सत्कार केला.

****

तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी मंदिरात जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते सपत्निक शतचंडी यज्ञाची पूर्णाहुती करण्यात आली. दुर्गा सप्तशती, तुळजा सहस्त्रनाम, भवानी सहस्त्रनाम आणि नवग्रहांचं हवन करण्यात आलं.

****

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई इथल्या श्री योगेश्वरी देवीच्या दसरा नवरात्र महोत्सवात आज मंदिरात अष्टमीसह नवमी निमित्तानं बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी सपत्निक होम हवन करून पूर्णाहुती दिली. पाठक यांच्या हस्ते योगेश्वरी देवी

महापूजा करण्यात आली. उद्या विजयादशमीच्या मुहूर्तावर दुपारी एक वाजता श्री योगेश्वरी देवीच्या पालखीची मिरवणूक, सीमोल्लंघनासाठी मंदिरातून निघणार आहे.

****

माहूर इथं रेणुकादेवीच्या दर्शनासाठी नागरिक मोठ्या संख्येनं गर्दी करत आहेत. राज्याच्या कानाकोपऱ्यासह परराज्यातून येणाऱ्या भाविकांसाठी मंदिर व्यवस्थापन समितीच्या वतीनं सुरक्षेसह विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथं कर्णपुरा परिसरात आज अष्टमीनिमित्तानं भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. मंदिर परिसरात भरलेल्या जत्रेला भेट देणाऱ्या महिला आणि मुलांची संख्या लक्षणीय आहे.

****

नवरात्रोत्सवानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथं आयोजित दीपश्री संगीत महोत्सवाचा आज समारोप होत आहे. आज सायंकाळी देगलुर इथले बासरीवादक अनहद वारसी आणि प्रसिद्ध शास्त्रीय गायिका विदुषी शुभदा पराडकर यांच सादरीकरण होईल. काल या महोत्सवात युवा व्हायोलिन वादक प्रबोध जोशी यांचं व्हायोलिन वादन तसंच ज्येष्ठ संगीतकार पंडित विश्वनाथ ओक यांचा रंगात रंगले राग हा कार्यक्रम सादर झाला.

****

उद्या साजऱ्या होणाऱ्या विजयादशमीनिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. यंदाची विजयादशमी सर्वांच्या जीवनात आनंद, समाधान आणि संपन्नता घेऊन येवो असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

****

१५ ऑक्टोबर दिवस जागतिक हात धुवा दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त नांदेड जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशन – ग्रामीण अंतर्गत विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत, शालेय विद्यार्थी आणि गावकऱ्यांना हात धुण्याच्या पद्धती, हात धुण्याचे फायदे, तसंच स्वच्छतेचं महत्व पटवून देण्यात येणार आहे.

****

परभणी जिल्ह्याच्या प्रत्येक गावात शेतकऱ्यांसाठी सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करावी तसंच कापसाला दहा हजार रूपये हमी भाव द्यावा यासह इतर मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात ढोल बजाओ आंदोलन करण्यात आलं. आमदार डॉ.राहुल पाटील यांच्या नेतृत्वात शिवसेनेच्या वतीनं जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आलं.

****